# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०६/२०२४ (मंगळवार) दुपार**

---

## शासकीय कर्मचाऱ्यावर हल्ला करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे कन्हान अंतर्गत फिर्यादि नामे– मनोज लक्ष्मणराव तुरणकर, वय ३८ वर्ष, रा. प्लॉट नं. ६८ विश्वकर्मानगर राजकलम चौक नागपूर ह. मु. आबेडकरवार्ड रामटेक ता. रामटेक हा वाहक म्हणुन एस. टी महामंडळ रामटेक ते नागपूर वर डयुटीवर असून दिनांक १०/०६/२०२४ रोजी तारसा चौक कन्हान येथे एस. टी. बस. क्र. एम. एच. ०७/सी–९४७३ ने रामटेक वरुन कन्हान कडे येत असता आरोपी महिला हि तिथे आली त्यांचे सोबत असलेले लोकांसोबत बसच्या आतमध्ये येवुन काही न बोलता बसच्या आतमध्ये येवुन बस मध्ये चढली व फिर्यादि कर्तव्यावर हजर असतांनी बसच्या आतमध्ये येवुन काही न बोलता फिर्यादिची कॉलर पकडून गालावर दोन थापडा मारले व त्यांचे सोबत असलेले एका अनोळखी इसमाने हातबुक्याने मारहान केली व फिर्यादिचे हातात असलेले १५००/– रु. खाली पडले व ड्रायव्हर साईड चा कांच तोडून १५००/– रु चे नुकसान केले व फिर्यादि हा डयुटीवर हजर असतांनी त्यांचे मनात भय निर्मान करुन धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे आरोपीविरूद्ध कलम ३५३, ३३२, ५०६, ३४ भा.द.वि. सहकलम सार्व. सं. नु. प्रति. अधि १९८४ अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा जैलाल सहारे करीत आहे.

## खापरखेडा पोलीसने केला हत्यार तस्करचा पर्दाफाश

महाराष्ट्रामध्ये मागील काही दिवसापासुन बंदुकीने गोळी फायर करून भरपुर गुन्हे घडलेले असल्याने नागपुर ग्रामीण येथील मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार साहेब यांनी नागपुर ग्रामीण जिल्हयातील उपविभागिय पोलीस अधिकारी व सर्व ठाणेदार यांना आर्म ॲक्टची कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्या आदेशाची अंमलबजावणी करून नागपुर ग्रामीण पोलीसांनी वेगवेगळया पोस्टे. अंतर्गत कोबीग ऑपरेशन करून रेकॉर्ड वरील आरोपींना चेक केले त्याच दरम्यान पोलीस उपविभागिय अधिकारी व ठाणेदार पोलीस स्टेशन खापरखेडा यांनी आर्म ॲक्टची कारवाई करिता एक पथक तयार करून त्या पथकाला आर्म ॲक्टची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्या अनुशंगाने पोलीस स्टेशन खापरखेडयाचे डीबी पथक हे पेट्रोलिंग तसेच आरोपी शोध करिता फिरत असताना वारेगाव क्षेत्रात मच्छीन्द्रनाथ मंदीर जवळ एक इसम संशयितरित्या फिरताना मिळुन आला त्यास पोलीस स्टेशन खापरखेडाचे डी. बी. पथकाने हटकले असता तो कमरेतुन काहीतरी फेकण्याचा प्रयत्न करित असतांना दिसला. त्याला काळजीपुर्वक ताब्यात घेऊन नाव पत्ता विचारले असता त्याने सोहेब अब्दुल खान रा. कामठी कॉलनी नं. ०३ ता. पारशिवनी असे सांगितले असता त्याची अंगझडतीत त्याचे कमरेतुन एक देशी कट्टा (अग्नीशस्त्र) कि. १०,०००/– रू. मिळुन आल्याने सदर अग्नीशस्त्रे जप्त करून त्याचेवर कलम ३/२५, ५/२५ माहका सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल केला तपासादरम्यान आरोपी सोहेल खान याने आपले मित्र आशिष यादव आजमगड उत्तरप्रदेश येथे जाऊन लोचय यादव रा. आजमगड उत्तरप्रदेश यांचेकडुन विकत घेतली आहे. यावरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथील डी बी पथक यांनी लगेच कन्हान

कांद्री येथुन आशिष यादव नावाचे व्यक्तीला अटक करून ग्राम टोटवा ठाणा महाराजगंज जि. आजमगड उत्तरप्रदेश येथुन लोचय बल्ली यादव यांना ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आणुन अटक केले पुढील तपास सुरू आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार सा., मा. अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ सा. उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान श्री. संतोष गायकवाड सा. यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार धनाजी जळक, पोउपनि आरती नरोटे, डी.बी. पथक येथील प्रफुल राठोड, शैलेश यादव, कविता गोंडाने, मुकेश वाघाडे, राजु भोयर, राजकुमार सातुर यांचे पथकाने पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर